सहाय्यक आयुक्त / जिल्हा महिला बाल विकास अधिकारी / बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी)/ परिविक्षा अधिक्षक गट-अ संवर्गातील अधिका-यांच्या विनंतीनुसार बदली करणेबाबत सन २०१७.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन आदेश क्रमांक : मबाआ २०१७/प्र.क्र.८८ (भाग-१)/का.७
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ०४ डिसेंबर, २०१७

वाचा:- शासन आदेश क्रमांक : मबाआ २०१७/प्र.क्र.६८/का.७, दिनांक ३१/०५/२०१७

-: शासन आदेश :-

महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम-२००५ कलम ४(४) व ४(५) मधील तरतुदींनुसार बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) / जिल्हा महिला बाल विकास अधिकारी यांना प्रशासकीय कारणास्तव त्यांच्या पदस्थापनेत अंशत: बदल करुन सुधारीत पदस्थापना देण्यात येत आहे.

अ. क्र.	अधिका-यांचे नाव व पदनाम	बदलीने पदस्थापनेचे कार्यालय	सुधारीत पदस्थापनेचे कार्यालय
१	२	३	४
१	श्री. अर्चना इंगोले , जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी	जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, बुलढाणा	बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी), अमरावती (नवीन)

२. आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना कळविण्यात येते की, वरीलप्रमाणे पदस्थापना देण्यात आलेल्या अधिकाऱ्यांच्या पदस्थापनेचे आदेश तात्काळ निर्गमित करावेत.

३. वरीलप्रमाणे करण्यात येत असलेल्या अधिकाऱ्यांच्या पदस्थापनेच्या आदेशासोबत त्यांचे गोपनीय अहवाल, सेवापुस्तक, तसेच अंतिम वेतन प्रमाणपत्र बदली करण्यात आलेल्या नवीन कार्यालयाकडे तात्काळ पाठविण्यात यावे.

४. वरीलप्रमाणे पदस्थापना करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांना शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करु नये महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) (नियम-३०-सी) नुसार मुळ कार्यालायाने पदस्थापना झालेल्या अधिकाऱ्यांचे कोणत्याही प्रकारची रजेचे अर्ज स्विकारु नयेत. बदली झालेल्या अधिकाऱ्यांकडून रजेचे अर्ज प्राप्त झाल्यास ते पदस्थापनेच्या ठिकाणी पाठवावे.

५. वरीलप्रमाणे पदस्थापना करण्यात येत असलेल्या अधिकाऱ्यांना पदस्थापनाने देण्यात आलेल्या पदावर रुजू करुन घेताना, ते रजेवर / गैरहजर होते किंवा कसे याबाबतची खातरजमा त्यांना पदस्थापनेवर हजर करुन घेणाऱ्या कार्यालयाने करावी. सदर अधिकारी वैद्यकीय कारणास्तव गैरहजर असतील तर त्यांना हजर करुन घेण्यापूर्वी वैद्यकीय मंडळासमोर पाठवावे. जर अन्य रजेवर होते असे आढळल्यास त्यांचेकडून न चुकता तसा रजेचा अर्ज भरुन घ्यावा आणि नंतर हजर करुन घ्यावे. तसेच रजा संदर्भात शासनाने वेळोवेळी प्रसृत केलेल्या शासन निर्णय / परिपत्रकांतील निदेशांचे पालन करावे.

६. उपरोक्त अधिकाऱ्यांची पदस्थापना प्रशासकीय कारणास्तव करण्यात येत असल्याने त्यांना बदली विषयक प्रवासभत्ता व इतर अनुषंगिक लाभ अनुज्ञेय राहतील.

७. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७१२०४१६४८४८३१३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Lalsing Ramchandra Gujar

Digitally signed by Lalsing Ramchandra Gujar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3eb5f6c3e4855c5793924cf2a352b44266d360de02a2494e1a64477bf79d694, cn=Lalsing Ramchandra Gujar
Date: 2017.12.06 15:24:09 +05'30'

(ला. रा. गुजर)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मंत्री (म.व बा.वि), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२) मा.राज्यमंत्री (म.व बा.वि), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
३) मा.सचिव(म.व बा.वि),यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक,मुंबई-४०० ०३२.
४) आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे,
५) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, कोकण भवन, नवी मुंबई
६) सर्व विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास (आयुक्तालय, पुणे मार्फत)
७) संबधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी (आयुक्तालय, पुणे मार्फत)
८) महालेखापाल १ / २ (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखापरिक्षा), मुंबई / नागपूर(आयुक्तालय, पुणे मार्फत)
९) संबंधित अधिदान व लेखाधिकारी / जिल्हा कोषागार अधिकारी (आयुक्तालय, पुणे मार्फत)
१०) सर्व संबंधित अधिकारी, (आयुक्तालय, पुणे मार्फत)
११) निवडनस्ती ,कार्यासन ७ महिला व बाल विकास विभाग.